

**खडकवासला येथील यशवंत विद्यालयात व्यक्तिमत्त्व विकास उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांसह मान्यवर.**

# यशवंत विद्यालयात विविध उपक्रम

**खडकवासला :** क्विक हिल फाउंडेशन व पंख संस्थेच्या वतीने खडकवासला येथील यशवंत विद्यालयाती विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम सुरू करण्यात आले आहे. शैक्षणिक व शारीरिक गुणवत्ता वाढण्याबरोबर सक्षम तरुण घडावेत यासाठी नेतृत्वगुण, ठामपणा, संघटन कौशल्य, आव्हान स्वीकारणे अशा प्रकारचे विविध गुणांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांचे गट तयार करून गटाला फ्लायिंग यंगस्टरअसे नाव देण्यात आले आहे. क्विक हिल कंपनीचे अजय शिर्के, पंख संस्थेच्या स्मिता आपटे, यशवंत विद्यालयाचे पर्यवेक्षक एस. बी. बांदल, चौरे, येवले आदी उपस्थित होते. संयोजन शाळांगण समुपदेशक श्वेता सूर्यवंशी, सचिन भापकर व मृणाल मापुस्कर यांनी केले.